**“एप्रिल २०२२” या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या <u>महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...</u>**

**(क) <u>शासन निर्णय / अधिसूचना</u>**

- दिनांक ०५ एप्रिल २०२२ च्या शासन निर्णयान्वये कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीकरीताच्या विभागीय परीक्षेचा अभ्यासक्रम सुधारित करण्यात आला आहे.
- दिनांक ०७ एप्रिल २०२२ च्या शासन ज्ञापनान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांचे मंत्रालयीन प्रशासकीय विभाग व बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयातील एकूण १७९ लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) पदावर नियत वाटप करण्यात आले आहे.
- दिनांक ०८ एप्रिल २०२२ च्या पृष्ठांकन अन्वये केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या दिनांक ३१.०३.२०२२ च्या कार्यालयीन ज्ञापनानुसार महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना दिनांक ०१.०१.२०२२ पासून ३४% दराने महागाई भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे.
- दिनांक १३ एप्रिल २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये कक्ष अधिकारी विभागीय परीक्षा २०२२ च्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.
- दिनांक १८ एप्रिल २०२२ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन (खुद्द) विभागासाठी लेखनसामुग्री / स्टेशनरी खरेदी करण्यासाठी पुरवठाधारक निश्चित करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
- दिनांक २२ एप्रिल २०२२ च्या शासन निर्णयान्वये वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता माहे एप्रिल २०२२ करीता रू.६.०० लाख इतके सहायक अनुदान मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २६ एप्रिल २०२२ च्या शासन निर्णयान्वये केंद्र शासनाकडील अ.भा.सेवेतील अधिकाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना प्रवास भत्ता व विमान प्रवास संदर्भातील अनुज्ञेय सवलती मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक २७ एप्रिल २०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत केलेली प्रश्नपत्रिकांची छपाई खाजगी मुद्रणालयामार्फत केल्यानंतर संबंधितांना देयके प्रदान करताना ई-कुबेर प्रणालीमधून सूट देण्यास मंजूरी देण्यात आली आहे.
- दिनांक २७ एप्रिल २०२२ च्या परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी यांच्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीकरीता सन २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षेसाठी केवळ अनुत्तीर्ण असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आला आहे.

**(ख) <u>नियुक्ती / पदोन्नती / पदावनती /परिविक्षा कालावधी / नियमित व पदोन्नतीचा मानीव दिनांक</u>**

- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या एकूण ८ सहायक कक्ष अधिकारी यांचे नियतवाटप करण्यात आले आहे.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या एकूण ३ परिविक्षाधीन अधिकारी (तहसिलदार गट-अ) यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करण्यात आला आहे.

**(ग) <u>बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त</u>**

**(घ) <u>प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन</u>**

- एका सहायक कक्ष अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(ङ) <u>ज्येष्ठतासूची</u>**

- दिनांक ११ एप्रिल २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये उप सचिव संवर्गाची दिनांक ०१.०१.२०१८ रोजीची तात्पुर्ती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ११ एप्रिल २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये अवर सचिव संवर्गाची दिनांक ०१.०१.२०१८ रोजीची तात्पुर्ती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २९ एप्रिल २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये निवडश्रेणी लघुलेखकांची दिनांक ०१.०१.२०२१ रोजीची सुधारीत अंतरीम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २९ एप्रिल २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये उच्चश्रेणी लघुलेखकांची दिनांक ०१.०१.२०२१ रोजीची सुधारीत अंतरीम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक २९ एप्रिल २०२२ च्या शासन परिपत्रकान्वये निम्नश्रेणी लघुलेखकांची दिनांक ०१.०१.२०२१ रोजीची सुधारीत अंतरीम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

* * * * * *